**नि.फौ.ख.क्र.४५/२०१९**
**शासन वि. इजाज अहमद**
**नि.क्र.६२**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.५**

नावः मोहम्मद नईम अब्दूल रहीम पटेल,

वयः ५० वर्ष, धंदाः मजूरी,

पत्ताः गुजरी बाजार, तह. कामठी, जि. नागपूर

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र.५ याचा सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती एच.एन.पिंपळीकर यांच्यामार्फत शपथेवर सुरुः**

**१.** घटना दिनांक २८/०१/२०१४ रोजी डोरली या गावातील आहे. त्या रोजी सलीम पटेल यांनी मला सांगितले की, आपल्या शेतात झाडे कापलेली आहे. दोन तीन मीत्र मिळून आम्ही डोरली या गावी गेलो. तेथे काही झाड कापलेले होते. कापलेले झाड हे बबूल, नीम, सागवन असे एकूण ६०-६२ झाड होते. घटनास्थळावर बाबू कश्यप ठेकेदार हजर होता. तो मजूरांकडून झाड कापून घेत होता. बाबू कश्यप याने मला सांगितले की, झाडे कापणेकरीता ठेका आम्हाला तारीक कमाल व इजाज अहमद यांनी दिला. तारीक कमाल व इजाज अहमद तेथे हजर होते. मी त्यांना झाडे कापण्यास मनाई केली व म्हटले की, ही शेती आमची आहे. त्यानंतर त्यांनी झाडे कापणे थांबविले. त्यांनी रु.१,१५,०००/- (रुपये एक लाख पंधरा हजार फक्त) पर्यंत किंमतीचे झाड कापले होते. त्यानंतर आम्ही फोटो घेवून पोलीस स्टेशनला पारशिवनी येथे तक्रार दिली. आज रोजी न्यायालयात तारीक कमाल हजर आहे. ईतर आरोपी न्यायालयात हजर नाहीत.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपी क्र.१ व २ तर्फे श्री पी.एस.सायरे वकील साहेब यांच्यामर्फत उलटतपास शपथेवर सुरुः-**

२. हे म्हणणे खरे आहे की, इजाज अहमद याच्या पत्नीचे नाव ७/१२ उताऱ्यावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, शेतीचे आज पर्यंत वाटणे झाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ व २ यांचा घटनेशी काहीही संबंध नाही. पोलीसांनी माझे बयान दिनांक २५/०८/२०१७ रोजी नोंदविले होते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २८/०१/२०१४ पासून २५/०८/२०१७ या कालावधीत मी कामठी येथे होतो. हे म्हणणे खरे नाही की, या प्रकरणात माझे वडिल सगळ्यात जास्त रस घेत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी वडिलांच्या सांगण्यावरुन खोटी साक्षी देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

GAJENDRA ONKARRAO WANKHADE Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE Date: 2025.06.21 12:58:37 +0530

**(जी.ओ. वानखडे)**

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

समक्ष,

GAJENDRA ONKARRAO WANKHADE Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE Date: 2025.06.21 12:58:44 +0530

**(जी.ओ. वानखडे)**

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

दिनांकः २१/०६/२०२५